प्रथम टप्प्यात राज्यातील पाच जिल्हा
रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये
व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र सुरु
करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**रोजगार व स्वयंरोजगार विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः रोस्वरो-२०१२/प्र.क्र.३०९/रोस्वरो-१**
जी.टी.हॉस्पीटल संकुल इमारत, ५ वा मजला
नवीन मंत्रालय,मुंबई- ४०० ००१
तारीख: १६ जुलै,२०१४

**वाचा -**

**१) शासन निर्णय क्रमांकः रोजगार व स्वयंरोजगार विभाग, रोस्वरो-२०१२/प्र.क्र.३०९/ रोस्वरो-१, दिनांक १९ मे,२०१४**

**प्रस्तावना -**

रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या क्रमांक- रोस्वरो-२०१२/प्र.क्र.३०९/रोस्वरो-१, दिनांक १९ मे,२०१४ च्या शासन निर्णयान्वये राज्यात रोजगार व स्वयंरोजगार केंद्रामध्ये व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून पहिल्या टप्प्यात मुंबई उपनगर, औरंगाबाद, नागपूर, सांगली व सिंधुदूर्ग येथे अशी केंद्रे स्थापन करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या केंद्रांसाठी येणारा खर्च भागविण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्याचा तसेच या योजनेसाठी नवीन लेखाशिर्ष सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

## शासन निर्णय-

मुंबई उपनगर, औरंगाबाद, नागपूर, सांगली व सिंधुदुर्ग येथे स्थापन करावयाच्या केंद्रांसाठी येणारा खर्च भागविण्यासाठी खालीलप्रमाणे लेखाशिर्ष सुरु करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

" मागणी क्रमांक झेड-ए-०१
प्रधान लेखाशिर्ष-२२३०-कामगार व सेवायोजन
०२- सेवायोजन सेवा, ००१-सेवायोजन व प्रशासन,
०६-व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्रांची स्थापना ( संकेतांक २२३०६०३८)"

२. हा शासन निर्णय महालेखापाल, ( लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक TM Secn./UOR/S&ES/१६१५, दिनांक ०७.०५.२०१४ व वित्त विभागाच्या अनौपचारिक

संदर्भ क्रमांक १३१/अर्थ-१८, दिनांक २०.०५.२०१४ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे व तो महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०८२२११४५१६०६०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Usha Prakash Mahajan

Digitally signed by Usha Prakash Mahajan
DN: c=IN, o=Govt of Maharashtra, ou=Employment and self employment, postalCode=400032, st=maharashtra, cn=Usha Prakash Mahajan
Date: 2014.08.22 11:43:04 +05'30'

**(उ.प्र.महाजन)**

**शासनाच्या सह सचिव**

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. सर्व विधान मंडळ सदस्य
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
७. महालेखापाल , ( लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१,मुंबई ( TM Section/VLC Section)
८. महालेखापाल, ( लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१,मुंबई
९. वित्त विभाग, व्यय-५ व अर्थ-१८, मंत्रालय,मुंबई
१०.नियोजन विभाग, का-१४७१
११.आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास, कोकण भवन, नवी मुंबई
१२.सर्व सहायक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र
१३.महाराष्ट्र कौशल्य विकास संस्था, मुंबई
१४.संचालक, यशदा, पुणे
१५.निवड नस्ती- रोस्वरो-१